




दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

बुलडाणा, सोमवार, दि.०९ जून २०२५

**वर्ष : ०४**, अंक : २९८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com


## पोहण्याचा मोह जीवावर बेतला...

### दोन मित्रांचा एकत्र अंत, लोणावळ्यात खळबळ !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, पुणे :** पावसाळा सुरु झाला की पर्यटन पण बहरू लागते. पर्यटनासाठी येणाऱ्या अनेक पर्यटकांना मोह आवरत नाही आणि यातून काही भयानक घटना घडतात. अशीच एक घटना लोणावळ्यातून समोर आली आहे. भुशी डॅममध्ये पोहण्याचा मोह न आवरल्याने दोन तरुणांचा बुडून मृत्यू झाला आहे. हे दोन्ही पर्यटक उत्तर प्रदेशमधील असल्याची माहिती समोर आली आहे. मो. जमाल आणि साहिल असराफ अली शेख अशी दोघांची नावे आहेत. पाण्याचा अंदाज न आल्याने ते बुडाले असल्याची माहिती समोर आली आहे.



याबाबत मिळालेली माहिती अशी की, रविवार असल्याने मोहम्मद जमाल आणि साहिल हे दोघे मित्रांसोबत पर्यटनासाठी लोणावळ्यातील भुशी धरणावर आले होते. पाणी पाहून त्यांना पोहण्याचा मोह आवरला नाही. यामुळे सोबत असलेले सर्वजण पोहण्यासाठी धरणाच्या पाण्यात उतरले. मात्र, पाण्याचा अंदाज न आल्यामुळे ते धरणातील खोल पाण्यात गेले असताना बुडाले. सोबत असलेल्या मित्रांनी आरडाओरड केली. मात्र, त्याचा काही उपयोग झाला नाही. तर घटनेची माहिती लोणावळा पोलिसांना देण्यात आली. यानंतर पोलिसांचे पथक आणि शिवदुर्ग मित्र लोणावळा रेस्क्यू टीमच्या सदस्यांनी या कठीण परिस्थितीत अतुलनीय धैर्य दाखवले. या ऑपरेशनमध्ये महेश मसणे, सचिन गायकवाड, कपिल दळवी, योगेश दळवी, दुर्वेश साठे, कुणाल कडू, हर्षल चौधरी, नीरज आवंढे, अशोक उंबरे, पिंटू मानकर, साहेबराव चव्हाण, श्याम वाल्मीक, महादेव भवर आणि राजेंद्र कडू यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या घटनेत पाण्याचा प्रवाह तीव्र असल्याने बचाव कार्यात अडचणी आल्या, परंतु टीमच्या समन्वय आणि निश्चयामुळे दोन्ही मृतदेह शोधण्यात यश मिळाले आहे.






## रेल्वे प्रकल्पाच्या कामामुळे विसापूर गावात धुळीचे व वाहतुकीचे संकट..

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०८, चंद्रपूर :** रेल्वेच्या कामासाठी स्थानिक शेतातून मातीचे उत्खनन करून ती वाहून नेण्यासाठी प्रायव्हेट कंपन्यांकडून जड वाहने डंपर, ट्रक, जेसीबी सतत मार्गांवरून चालवली जात आहेत. यामुळे गावातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. वाहनांच्या सततच्या वजनदार वाहतुकीमुळे रस्ते उखडले गेले असून मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे विसापूर गावात धूळकणांचा हैदोस, रस्त्यांची वाट लागलेली अवस्था, अपघाताचे प्रमाण वाढलेले आणि शाळकरी मुलांचे शिक्षण धोक्यात आले आहे. यासह प्रदूषणामुळे वृद्ध व लहान मुले आजारी पडत आहेत. ग्रामस्थांच्या तक्रारी असूनही प्रशासन आणि कंपन्यांचे दुर्लक्ष सुरूच आहे.



मागण्या मान्य न झाल्यास वंचितचा आंदोलनाचा इशारा

या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष सिद्धांत पुणेकर यांच्या नेतृत्वात विसापूर ग्रामस्थांनी पुढील मागण्या प्रशासनासमोर ठणकावून मांडल्या आहेत, गावातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांची तातडीने डागडुजी करून काँक्रिटीकरण करावे, जड वाहनांवर वेळेचे (सकाळी ७-१० व संध्याकाळी ४-६) निर्बंध लावावेत, शाळा सुरू असताना वाहतूक पूर्ण बंद ठेवावे, वाहने बाहेरून चालवण्यासाठी दुसरे मार्ग वापरावेत – गावातून वाहनांना मज्जाव करावा. प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी पाणी मारणे बंधनकारक करावे. रस्त्याच्या कडेला झाडे लावून धुळीपासून संरक्षण करावे. अपघातग्रस्त रस्त्यांबाबत कंपन्यांकडून वार्षिक निधी मागवावा, सीएसआर अंतर्गत गावात सामाजिक कामे सुरू करावीत. गावात जड वाहनांसाठी स्पीड लिमिट लागू करावी व स्पीड ब्रेकर बसवावेत. या मुद्द्यावर तातडीने तहसीलदार व जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ग्रामसभा घ्यावी. हा विकास नाही हा ग्रामस्थांवर लादलेला अन्याय आहे, गावकऱ्यांच्या सहनशीलतेचा सरकार आणि कंपन्या गैरफायदा घेत आहेत! विसापूर मधील जनतेला रस्त्यांवरून चालताना जीव मुठीत धरावा लागतोय. रेल्वेच्या कामासाठी जमिनी घेतात, माती उचलतात, पण त्याचा त्रास मात्र गावकऱ्यांना यावर त्वरित उपाययोजना करा. अशी जळजळीत मागणी वंचितचे सिद्धांत पुणेकर यांनी केली आहे.

प्रायव्हेट कंपन्यांचा निष्काळजीपणा, प्रशासनाचे दुर्लक्ष, आणि जनतेच्या आरोग्य व सुरक्षिततेचा होणारा विध्वंस या विरोधात वंचित बहुजन युवा आघाडी आवाज उठवत आहे. जर प्रशासन आणि कंपनीने मागण्या मान्य केल्या नाहीत, तर आम्ही विसापूरमध्ये तीव्र आंदोलन छेडू. रस्ते ठिय्या, प्रशासनाला घेराव, आणि गरज भासल्यास काम बंद आंदोलनाची तयारी वंचित बहुजन युवा आघाडीने केली आहे. यावेळेस ग्रामपंचायत कार्यालयाला निवेदन देताना वंचित बहुजन युवा आघाडी जिल्हा उपाध्यक्ष सिद्धांत पुणेकर, नीलजय गावंडे, समीर शेख, विज्ञान अलोणे, कपिल चुनारकर, उदय भगत, उत्कर्ष करमणकर व इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सांगलीच्या राजकारणात नवा ट्विस्ट !

### चंद्रहार पाटील आता सरकारसोबत जाणार; ठाकरे सेनेला रामराम...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, सांगली :** डबल महाराष्ट्र केसरी आणि ठाकरे गटाचे नेते चंद्रहार पाटील यांचे अखेर ठरले आहे. त्यांनी ठाकरे सेनेला रामराम ठोकला असून महायुती सरकार सोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे. सोशल मीडिया अकाउंट एक्स वरून त्यांनी हा निर्णय जाहीर केला आहे.

यामुळे ठाकरे सेनेला मोठा हादरा बसणार आहे. चंद्रहार पाटील यांनी सोशल मिडिया प्लॅटफॉर्म फेसबुकवर पोस्ट केली. यामध्ये त्यांनी लिहिले की, राज्यातील क्रीडा क्षेत्रामध्ये काम करत असताना, बऱ्याच त्रुटी, अडचणी, गैरप्रकार मी अनुभवलेले आहेत. अशा बाबींविरुद्ध मी वेळोवेळी आवाज देखील उठवला आहे. परंतु, प्रत्यक्ष शासन सहभागाशिवाय असे प्रश्न मार्गी लागणे कठीण आहे. म्हणून क्रीडा क्षेत्रामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी व सामाजिक, राजकीय क्षेत्रात काम करण्यासाठी, मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी सरकार सोबत जाण्याचा निर्णय घेतलेला आहे, असं चंद्रहार पाटील म्हणाले.



चंद्रहार पाटील सोमवारी ठाण्यात एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. ठाकरेंच्या मशालीची साथ सोडून धनुष्यबाण हातात घेणार आहेत. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री उदय सामंत, मंत्री संजय शिरसाट, मंत्री शंभूराज देसाई, मंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री प्रताप सरनाईक हे ही उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान, गेल्या लोकसभा निवडणुकीत चंद्रहार पाटील उद्धव ठाकरे गटाकडून निवडणुकीत उतरले होते. सांगली लोकसभेच्या जागेवरुन हायव्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला होता. मविआत असतानाही त्यांच्याविरोधात काँग्रेसचे विशाल पाटील चंद्रहार पाटलांच्या विरोधात निवडणुकीत उतरले. विशाल पाटलांनी निवडणुकीत बाजी मारली. त्यामुळे चंद्रहार पाटील नाराज असल्याच्या चर्चा रंगल्या.

यातच काही दिवसांपासून चंद्रहार पाटील आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या नेत्यांच्या भेटीगाठी वाढल्या होत्या. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या मध्यस्थीने पाटलांनी एकनाथ शिंदेंची भेट घेतली. तर श्रीकांत शिंदेंनी ही डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील हे चांगले कार्यकर्ते आहेत, असे कौतुकाचे बोल उद्गारले होते. ते जर आमच्या शिवसेनेत येणार असतील, तर त्यांचे स्वागत आहे, असे म्हटले.

## थोडक्यात

### 'दैनिक अक्षराज'चे पत्रकार वसंत रांधवण राज्यस्तरीय पारनेर भूषण पुरस्काराने सन्मानित




**अक्षराज : राजकुमार ईकडे**

**दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) :** राज्यातील गरुड फाउंडेशन व महाराष्ट्र राज्य युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना शनिवार, दिनांक ०७ जून २०२५ रोजी राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ येथिल आण्णासाहेब शिंदे सभागृहात हा सोहळा नुकताच संपन्न झाला. यावेळी दैनिक अक्षराज मिडियाचे अहिल्यानगर जिल्हा प्रतिनिधी तसेच अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पारनेर तालुका उपाध्यक्ष पत्रकार वसंत रांधवण यांना राज्यस्तरीय पारनेर भूषण पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. यावेळी खासदार निलेश लंके, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, आकाश पुजारी (संस्थापक अध्यक्ष गरुड फाउंडेशन), पै. रावसाहेब (नाना) खेवरे (जिल्हाध्यक्ष शिवसेना, उबाठा), संदिप भांड (सहाय्यक पोलिस आयुक्त), विजुभाऊ तमनर (जिल्हाध्यक्ष यशवंत सेना), रमेश खेमनर (कार्याध्यक्ष, गरुड फाउंडेशन), बाळकृष्ण भोसले (युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष), प्रेमानंद महाराज (शास्त्री) आंबेकर, नामदेव पाटील (तहसीलदार), पत्रकार जावेद शेख, बबनराव घुमटकर, प्रमोद दिवेकर मधुकर घाडगे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले. त्याचप्रमाणे राज्यातून विविध क्षेत्रातून आलेले पुरस्कार्थी उपस्थित होते.

वसंत रांधवण यांचे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या माध्यमातून पारनेर तालुक्यात सामाजिक क्षेत्रात मागिल १६ वर्षापासून सातत्याने भरीव सामाजिक कार्य करत आहेत. तसेच पारनेर तालुक्यातील ग्रामीण भागातील पत्रकार असून निर्भिडपणे ग्रामीण भागातील प्रश्न मांडण्यासाठी विशेष प्रयत्न त्यांनी केले त्यामुळेच त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले. पुरस्कार मिळाल्याबद्दल मंत्री छगन भुजबळ, आम्ही टाकळीकर ग्राम विकास प्रतिष्ठान, खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी, दैनिक अक्षराज मिडियाचे मुख्य संपादक विनोद गोरे, सहसंपादीका प्राजक्ता गोरे -चव्हाण, पत्रकार राजकुमार ईकडे, टाकळी ढोकेश्वर परिसरासह तसेच पारनेर तालुक्यातील राज्य पत्रकार संघाचे सर्व पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे.

### अट्टल गुन्हेगाराकडून चोरीतील साहित्य व मोटारसायकल जप्त

**दि.०८, चंद्रपूर :** स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गुप्त माहितीवरुन एक इसम विना कागदपत्रे असलेले दुचाकी वाहन विक्रीकरीता तुकुम येथील एसटी वर्कशॉप जवळ आणले या माहितीवरुन पोलिसांनी सापळा रचून आरोपी दुचाकी वाहनासह ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता गडचिरोली येथील एका महिलेची चैन हिसकावल्याचे त्याने कबूल केले. जनरलसिंग ऊर्फ मन्नुसिंग टाक वय ४५ वर्ष रा. समतानगर, नेरी चौक, ऊर्जानगर चंद्रपूर असे आरोपीचे नाव आहे. आरोपीने काळ्या पांढरी रंगाची स्प्लेंडर प्रो मोटार सायकल एमएच ३४ एएक्स ३८४८ या क्रमांकाची मोटार सायकल नायडू हॉस्पिटल, तुकुम चंद्रपूर येथून चोरी केल्याचे कबूल केले. यावरुन आरोपींवर दुर्गापूर पोलिसात गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली आहे. सदरची यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, रिना जनबंधू अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रपूर यांचे मार्गदर्शनात पो. नि. अमोल चाकोरे स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांच्या नेतृत्वात पोउपनि विनोद भुरले, पोउपनि सुनिल गौरकार, पो. हवा. सुभाष गोहोकार, नितीन साळवे, नितीन कुरेकार, सतिष अवथरे, दिपक डोंगरे, गोपाल आतकुलवार, किशोर वाकाटे, शशांक बदामवर, प्रसाद धुळगंडे यांनी केली.

अक्षराज




## बिरसा मुंडा

आदिवासी समाजक्रांतीचे जनक व एक स्वातंत्र्यसेनानी. त्यांचा जन्म झारखंडमधील उलिहातु या छोट्याशा खेड्यात वडील सुगना व आई करमी या दांपत्यापोटी झाला. जन्म गुरुवारी म्हणजे बिस्युतवार किंवा बृहस्पतिवार या दिवशी झाला, म्हणून त्यांचे नाव 'बिरसाख्र ठेवण्यात आले. बिरसा यांच्या कुटुंबाची परिस्थिती हलाखीची होती. त्यामुळे बिरसांच्या जन्मानंतर सर्व कुटुंब उदरनिर्वाहासाठी बिरसांची आत्या दासकीर हिच्या आयुभातु या गावी गेले. बासरी व टुईला वाजविणे, नृत्य, नकला, चित्र रेखाटणे, आखाड्यात जाणे इत्यादी छंदही त्यांच्या अंगी होते.

बिरसांना शिक्षणाची आवड होती. सुरुवातीला ते आयुभातुजवळ सलगा गावी जयपाल नाग या आदिवासी व्यक्तीने चालविलेल्या आश्रमात जात. पुढे बिरसांचे मोठे भाऊ कानु यांनी त्यांना जर्मन ईसाई मिशन स्कूलमध्ये दाखल केले (१८८६). तत्पूर्वी शाळेच्या अटीनुसार त्यांना ख्रिश्चन धर्म स्वीकारावा लागला. शाळेमध्ये जर्मन लुथेरियन मिशनचे अध्यक्ष फादर नोट्रोट यांनी भाषणामध्ये मुंडा आदिवासींबद्दल ठग, चोर, बेइमान इत्यादी शब्दांचा वापर केला. तेव्हा बिरसा यांनी फादर नोट्रोट यांना खडसावून प्रत्युत्तर दिले. त्यामुळे बिरसांना शाळेतून काढण्यात आले (१८९०).

पुढे त्यांनी शिक्षणासाठी अंगीकारलेल्या ख्रिश्चन धर्माचा त्याग केला. उदरनिर्वाहासाठी ते बांदगाव येथे वास्तव्यास होते (१८९०–९४). त्यांचा विवाह हिरीबाई नामक मुलीशी झाला; परंतु अल्प काळातच तिचे निधन झाले. बिरसा यांनी आनंद पांडे या वैष्णवपंथीयांकडून धार्मिक शिक्षण घेतले. हे शिक्षण घेत असताना मुंडा जमातीच्या परंपरागत जीवनपद्धतीमध्ये, धर्मामध्ये परिवर्तन व सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांच्या लक्षात आले. हिंदू, ख्रिश्चन व मुंडा आदिवासी या धर्मांतील चांगली तत्त्वे एकत्रित करून नव्या बिरसाईट (इळऔरळींशी) धर्माची स्थापना करून त्यांनी लोकसंघटन केले, तसेच मुंडा जमातीत एकता निर्माण केली. ईसाई धर्म हा विदेशी असल्यामुळे तो आपल्या पूर्वजांच्या परंपरेला कलंकित करणारा आहे, अशी लोकजागृती ते करू लागले. त्यामुळे ते भगवान बिरसा म्हणून ओळखले जाऊ लागले.

# समृद्धीचा महामार्ग

एकनाथ पलमटे (भाऊ)
लातूर, ८३७९०८३१००

भारताला स्वातंत्र्य मिळून अनेक दशका उलटून गेली. या दशकाचा विचार केला तर, आपण विकासाच्या, समृद्धीच्या महामार्गावर कोठे आहोत. हे प्रत्येकालाच कळणार आहे. रस्ते विकास हा देशाच्या विकासाचा महत्त्वाचा दुवा आहे. यामध्ये संस्कृती, परंपरा, विचार, बाजारपेठ, देवाण–घेवाण या सगळ्या सोबत मन जोडणं आणि नविन विचार तयार करणे . व तो विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी विचारांचा महामार्ग अत्यंत गरजेचा आहे.. थोडक्यात कोणत्याही . औद्योगिक, भौतिक किंवा सामाजिक विकासाचा विचार केला तर रस्ते विकास हा राष्ट्र विकासाचा प्रमुख मापदंड ठरतो. कालच समृद्धी महामार्गाचा शेवटच्या टप्प्याचे मुख्य मंत्र्यानी लोकार्पन केले. आणि जनते साठी हा मार्ग मोकळा झाला. मनाला प्रश्न पडला रस्या सोबतच सामाजिक विकासाच्या बाबतीत काही समृद्धी महामार्गाची आवश्यक ता आहे असे मला वाटते.





स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचार, हुंडाबंदी, बलात्कार या घटना सतत घडत आहेत. घडलेल्या प्रकरणामध्ये कोण न्यायालयामध्ये दोषी ठरत आहे. संबंधित आरोपीला शिक्षा झाली हे कळण्यापर्यंत त्या प्रकरणाशी संबधित सामाजिक संवेदना बोथट होऊन जातात. कोणी सत्ताधाऱ्यांशी संबंधित, कोणी अधिकारी – कर्मचार्याशी संबधित, कोणी पैशाने मालामाल यामुळे अशा प्रकरणांमध्ये गरीब सामान्य लोकांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फुटण्याचे प्रमाण अल्पशे आहे. म्हणून ग्रामीण भागापासून राष्ट्रीय महिला आयोगाला जोडणारा व अन्याय रोखणारा समृद्धी महामार्ग कधी तयार करणार आहोत.

प्रशासन चालवण्यासाठी वेगवेगळे विभाग कार्यरत आहेत. त्या विभागामध्ये हजारोंच्या संख्येने कर्मचारी बांधव २४ तास काम करतात. महिला व बालकल्याण विभागात अंगणवाडी ताई चे तर काम अफाट आहे. रजिस्टर किती ? जिम्मेदारी किती ? वेगवेगळे सर्वे क्षण ? गाव पातळीवर कोणतीही माहिती त्यांच्याकडे अध्यायावत असते. अगदी लाडक्या बहिणीचे फॉर्म सुद्धा भरण्याचे काम ताईंनी केले. आणि तिचा पगार मात्र आठ हजार रुपये. काम २४ तास आहे. तिच्या कामाच्या मानाने तिला मिळणारा मोबदला फार कमी आहे. ताईंना मिळणारे मानधन कधी वेळेवर म्हणण्यापेक्षा चार चार महिने मिळत नाही. तसेच या विभागांतर्गत चालणारे महिला सुधार गृह, अनाथालय, शिशुगृह, बालग्रह यामध्ये काम करणाऱ्या कर्मचार्याचं वेतन चार – चार महिने मिळत नाही. एखाद्या श्रीमंत माणसा च्या घरी मजूरीला गेल्यावर त्यांना पैसे कसे मागावे.म्हणून विचार करणारा मजुर आणि या विभागात काम करणारा कर्मचारी याची व्यथा सारखीच. याना शासकिय नौकरी असुन सुद्दा कौटुबिक,आर्थिक आडचणीचा सामना करावा लागतो. यांच्या विभागाकडून महाराष्ट्र शासनाच्या अर्थ विभागाकडे जाणारा समृद्धी महामार्ग कधी जोडणार आहात ते सांगा.

भारत देश कृषीप्रधान आहे. माझा शेतकरी राजा आहे. अस सर्वजण म्हणतात. पण शेतकऱ्या नी पिकवलेला माल घरात येई पर्यन्त अनेक नैसर्गिक आणि मानव निर्मित आडचणी येतात. शेतकरी बांधवाना बी – बियाणे वेळेवर मिळत नाहीत. मिळाले तर महाग. बरं पिशवीवर किंमत एवढी असते की दुकानदाराला लाज वाटावी ती किमंत सांगताना. त्यापेक्षा कमि किमंती मध्ये बी बियाणे, खते, किटकनाशके विकतो. खरी किमंत त्यावर कधी छापणार. शेतकऱ्यांची अडचण, मनाला धिर आपण पालक म्हणून कधी देणार. नुसते पंचनामे, नुकसान भरपाई, पिक विमा यासारख्या मलम पट्ट्या किती दिवस करणार आहात. मुळात शेती साठी लागणाऱ्या वस्तु वरच्या एम. आर. पी. योग्य लिहण्याचा आणि शेतकर्याची समृद्धी वाढवण्याचा महामार्ग आपण कधी करणार आहात ते ठरवा. ?

आजारी पडल्यावर आपण वेगवेगळे विम्याचे कवच घेतो. आता शासनाने पण महात्मा फुले जन धन आरोग्य विमा चालू केला आहे. ती योजना राबविणारे शासकिय आणि खाजगी रुग्णालये भरपूर आहेत. आजारांचे निदान करण्यासाठी लागणाऱ्या वेगवेगळ्या तपासण्याचे दर खुपचं आहेत. त्याचे दरफलक शासन कधी ठरवणार. एखादयाने नविन दवाखाना सुरु केला की चार – दोन वर्षात मोठी इमारत, सुसज्य यंत्रणा, अद्ययावत रुग्णवाहीका हे सगळं जमा होताना पाहतो. रुग्णाची सेवा म्हणायची आणि त्याची आर्थिक कापणी करावयाची. औषधी दुकानातील गोळ्याच्या एम. आर. पी. वर विकणे. यातून खुप मलिदा लाटणे. हे चालू आहे. ही होणारी पिळवणूक यांबवणारा समृद्धी महामार्ग कधी आपण तयार करणार आहोत. ? ते ठरवा आधि.

दरवर्षी आपण वृक्षारोपण मोहीम वेगवेगळ्या शासकिय कार्यालया कडून हा कार्यक्रम राबवितो. दरवर्षी आपण आपल्या कार्यालयाच्या परिसरात वृक्ष लावताना चा फोटो काढतो. वृक्षारोपण केल्याचा आनंद चेहर्यावर दाखवणारा फोटो अपलोड करताना आपण शासनाच्या आदेशाचे किती पालन करतो. हे दाखवायला कमि पडत नाही. मग खरं सांगा भारता मध्ये आज मितीला वृक्ष्याची संख्या वाढलेली पाहिजे होती पण तसं झाल् का? आपल्या मनाला आणि शासकिय यंत्रणेला प्रामाणिक पणाने जोडणारा समृद्धी महामार्ग आपण कधी तयार करणार आहोत ?

निवडणूकीच्या काळात गेली ५ वर्ष आपण ठरवतो. नाही या वेळी योग्य उमेदवाराला निवडून देवू. यांनी काहीच विकास केला नाही. आपल्या गावापासुन ते संपूर्ण मतदार संघात काहीच बदल झालेला नाही.( काही लोकप्रतिनिधी विकास करतात.) गावात मुलभूत सुविधा नाहीत. सरपंच योग्य नाही. आमदार, खासदार तोंड दाखवत नाहीत. मग कार्यकर्त्याने काय करायचे. अश्या असंख्य प्रश्नाचे उत्तरे निवडणूकीत मतदानाच्या रुपाने देवू. हा विचार नेमका निवडनुकी च्या काळात आपले मन का विसरते. याचा शोध घेणारा समृद्धीचा महामार्ग आपण कधी तयार करणार आहोत? ते ठरवा.

बरं ते जाऊ द्या. आपला गाव आणि गावातील सांडपाणी, रस्ते, विज, शौचालये, स्वच्छ परिसर जतन करणे, वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धन, आरोग्य आणि आरोग्य विषयक जागृती, मतदान आणि मतदार व कर्तव्य विषयक जागृती, विकास संकल्पना व ति करण्यासाठी चे प्रयत्न. आपले हक्क आणि कर्तव्य व ती पूर्ण करण्याची जबाबदारी. शासनाने प्रतिबंद घातलेल्या बाबी व आपण त्याची करत असणारी अंमलबजावणी या सर्व बाबी शांतपणे मनाला विचारा आणि विकासाच्या समृद्धीच्या महामार्गावर आपण कोठे आहोत ? आपली त्या मार्गा सोबत ची संपर्काची जागा कोठे आहे ? याचे आत्मपरिक्षण करूया. आणि आपले मन आणि कर्तव्य यांना जोडणारा समृद्धी महामार्ग तयार करून तो प्रशासनाने तयार केलेल्या समृद्धी महामार्गाला जोडू या. कारण विकास म्हणजे तरी काय हो? सार्वजनिक नळाचे पाणि श्रीमंत व्यक्तीला सुद्धा प्यावे से वाटणे. प्रत्येकाच्या मनाला वाटल पाहिजे की मी सरकारी दवाखान्यात उपचार घेणार. सार्वजनिक वाहनातून प्रवास करण्याची इच्छा होण . या बाबी दिसण्या साठीचा समृद्धी महामार्ग कुठे दिसेल का? याची मन वाट पाहतयं ... रस्ता शोधतयं समृद्धी महामार्ग

## पेरणी

मृग नक्षत्राचा आरंभ होता
काळ्या ढगांची गर्दी आकाशात
वारा थांबतो,उकाडा वाढतो
सायंकाळी पाऊस पडतो

सरीवर सरी कोसळतात
पाणीच पाणी पसरवतात
ओल्या मातीचा सुगंध दरवळतो
रोम रोम पुलकित होतो

शेतकऱ्यांना पेरणीची घाई
तिफणीला तासून घेई
खत बियाणांची खरेदी
पुरेशा माणसांची जोडणी

धो धो पाऊस बरसतो
मातीत पाणी जिरवतो
सकाळी शेतकरी शेतात
पेरणीची तयारी जोरात

शिवार माणसांनी फुलतो
पेरत्या व्हा शीळ ऐकतो
शेतकरी चाड्यावर मूठ धरतो
खत बियाणे मातीत पेरतो

सगळ्या शिवारात पेरणी चाले
उनाड वारा हळूच शीळ घाले
पेरणी सुंदर उत्सव शेतीचा
माणसांत माणुसकी पेरण्याचा

**– बबन दामोदर गुळवे**
**जि.लातूर.मो.९५४५४४२६४८.**

## कोट्यामधून

द्यावे आता निवडून
स्पेशलकोट्यामधून
मागणी करे नेतोबा
बरोबर संधी साधून

गंगापुत्रा शर संधान
शिखंडीमागून दडून
अशक्य प्राय विजय
समोरासमोर भिडून

स्पष्ट कौल जनतेचा
उपयोग नसे चिडून
तळागळात ओढता
उंच मनो–यात चढून

श्रोते ऐकतात फक्त
भाषणे जीव तोडून
मतदानाच्या दिवशी
जातात नाती तोडून

मते खाणारे मशीन
भंगारात राही पडून
वापर घेतात करुन
प्रतिस्पर्ध्यास पाडून

कळून चुकले आता
उपयोग नाही लढून
मिळत नसे सहजते
घ्यायचे सरळओढून

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## वाचक पत्र



### सणांवर विनोद करू नका !

आताचे युग हे सोशल मीडियाचे युग आहे. तरुणाई दिवसातील आपला बराच वेळ हा सोशल मीडियावर व्यतीत करत असते. सण–उत्सव जवळ आले की त्याविषयी जशा माहिती देणाऱ्या रिल्स सोशल मीडियावर येऊ लागतात तशा त्या सण–उत्सवांवर विनोद करणाऱ्या, सणांविषयी गैरसमज पसरवणाऱ्या रिल्स आणि व्हिडीओज सोशल मीडियावर फिरू लागतात. वटपौर्णिमा जवळ आल्याने वटपौर्णिमा सण साजरा करण्यामागील शास्त्र अथवा या सणाचे महत्व लक्षात न घेता त्यावर फालतू विनोद करणाऱ्या अनेक रिल्स सध्या मोबाईलवर येऊ लागल्या आहेत. हिंदू असूनही आपल्याच सणांवर विनोद करणाऱ्या त्या रिल्स पाहून आपण हसत आहोत आणि त्या इतरांनाही पाहण्यासाठी फॉरवर्ड करत आहोत. वटपौर्णिमा झाली की सण–उत्सवांना सुरुवात होते. सृष्टीत होत जाणारे बदल तसेच धर्मग्रंथातील सत्यकथा यांचा आधार हिंदू धर्मातील सण आणि उत्सवांमागे दडलेला असतो. प्रत्येक गोष्ट ही ईश्वराचेच रूप असून जीवसृष्टीसह निर्जीव वस्तूतही त्याचे अस्तित्व असते त्यामुळे या सर्वांचा सन्मान करण्याची शिकवण या सणांच्या माध्यमांतून आपल्याला मिळत असते. वटपौर्णिमेला वडाला म्हणजेच वृक्षाला पुजले जाते. नागपंचमीला नागाला, तर पोळ्याच्या दिवशी बैलाला पुजले जाते. दसऱ्याच्या दिवशी वापरातील उपयुक्त शस्त्रांचे आणि वस्तूंचे पूजन केले जाते. पितृपक्षाच्या निमित्ताने कावळ्याच्या रूपाने पूर्वजांना घास भरवला जातो. अशाप्रकारे चराचरावर निरपेक्ष प्रेम करायला शिकवणारे हिंदू धर्मातील सण हिंदू धर्माचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. आताच्या पिढीवर असलेला पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव आणि घरातून सणांविषयी न मिळणारे ज्ञान यांमुळे हिंदूंच्या सण–उत्सवांवर विनोद करताना आणि ते फॉरवर्ड करताना यांना फारसे वावगे वाटत नाही; मात्र ज्यांना आपले सण आणि उत्सव याविषयीचा सार्थ अभिमान आहे त्यांनी अशा रिल्स किंवा व्हिडीओज पुढे न पाठवता ते पाठवणाऱ्यांना सणांमागील शास्त्र सांगावे...

**– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

## कळंब व स्थानकातील पाणपोईचा लोकार्पण सोहळा संपन्न...

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०८, कळंब :** येथील बस स्थानकात कळंब शहरातील प्रतिष्ठित व्यापारी स्वर्गीय कैलास जी अग्रवाल यांच्या स्मरणार्थ त्यांच्या परिवाराकडून स्वखर्चाने उभारलेल्या अत्याधुनिक पाणपोईचा लोकार्पण सोहळा कळंब धाराशिव विधानसभा मतदारसंघाचे आमदार कैलास पाटील यांच्या हस्ते दि.०८ जून रविवार रोजी करण्यात आला.

कळंब बस स्थानकात स्वखर्चातून उभा करण्यात आलेल्या अत्याधुनिक पाणपोईची व्यवस्था अग्रवाल परिवाराकडून करण्यात आली होती. या पाणपोईचा खर्च जवळपास सहा लाख रुपये खर्च करून उभारण्यात



आलेल्या प्रवाशांच्या आरोग्यवर्धक स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून पाणपोई चा माध्यमातून लोकार्पण सोहळा नुकताच आमदार कैलास पाटील यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी अग्रवाल परिवारातर्फे श्रीमती रेखाताई अग्रवाल, कल्पेश अग्रवाल, कार्तिक अग्रवाल, कविता अग्रवाल, योगेश अग्रवाल, विभागीय वाहतूक अधिकारी अभय देशमुख या कार्यक्रमाचे अध्यक्ष कळंब चे आगार प्रमुख एस.डी. खताळ त्याचप्रमाणे दिलीप पाटील, मोहन जाधव, प्रदीप मेटे, प्रभाकर झांबरे, दत्ता मुंडे, वाहतूक नियंत्रक हनुमंत मुंडे, करसन पटेल, संजय देवडा, अमोल वाघचौरे, शिवाजी निळे, विष्णू कोल्हे, राजाभाऊ देशमाने, डॉ. श्याम चौधरी, ठेकेदार श्री टेकाळे यांच्या सह आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ज्योतीराम तर व प्रभाकर झांबरे यांनी केले तर कार्यक्रम पार पाडण्यासाठी कळंब बस स्थानकातील राज्य परिवहन महामंडळाचे कर्मचारी व अधिकारी यांनी परिश्रम घेतले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## चोरटी वाळू प्रकरणी...

### धारूर न्यायालयाचा महत्वपुर्ण निकाल...




**अक्षराज : शुभम शुक्ला**

**दि.०८, किल्ले धारूर :** चंद्रकांत लिंबाजी घोळवे पोलीस उपनिरीक्षक पोलिस स्टेशन धारुर यांनी दिनांक २४/०४/२०१७ रोजी दिलेल्या फिर्यादी वरुण आरोपी बंदे नवाज सिकंदर मुल्ला रा. वांगी ता. दक्षिण सोलापुर जि. सोलापुर यांच्या विरुद्ध कलम २१(१) (२) (३) (४) (५), ४८ (७) (८) गौन खनिज अधिनियम व कलम ३७९ भारतीय दंड संहिते प्रमाणे गु.र. क्रमांक १५६/२०१७ दाखल झालेला होता.

घटनेची थोडक्यात हकिकत अशी आहे की, दिनांक २४/०६/२०१७ रोजी ०१.५० वाजण्याचे सुमारास पोलिस उपनिरीक्षक चंद्रकांत घोळवे व पोलिस कॉस्टेबल शेटे, पोलिस कॉस्टेबल राठोड, पोलिस कॉस्टेबल वडमारे असे शिवाजी चौक धारुर येथे नाकाबंदी करीत आसताना ०२.०० वाजण्याचे सुमारास एक आएशिअर कंपणीचा ट्रक चक१३ अद३५३३ आल्याने त्यास त्यास उभा करुण उजेडात पाहिल्या नंतर सदर ट्रक मध्ये वाळु दिसुन आली, वाळुची विक्री व वहातुक करण्यास बंदी आसताना सदर ट्रक चालकाने विना परवाना बेकादेशिररीत्या अंदाजे सहा ब्रास वाळुची विक्री करण्यासाठी बंदी आसताना वाळुसह मिळुन आला, वाळु विक्री साठी बंदी आसताना मिळुन आसल्याने सदर वहाण ताब्यात घेऊण पोलीस उपनिरीक्षक पोलिस स्टेशन धारुर यांनी दिलेल्या फिर्यादी वरुण आरोपीचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला होता, आरोपीचे विरुद्व गुन्हा दाखल झाल्या नंतर सदर गुन्हयात तपास अधिकारी पोलिस स्टेशन धारुर चंद्रकांत घोळवे यांनी तपासाअंती आरोपीचे विरुद्ध दोषारोपपत्र दाखल केलेले होते.

सन्माननिय प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब धारुर यांच्या न्यायालयात कलम २१(१) (२) (३) (४) (५), ४८ (७) (८) गौन खनिज अधिनियम व कलम ३७९ भारतीय दंड संहिते प्रमाणे चार्जशिट दाखल झाल्या नंतर नोंदवण्यात आलेल्या साक्षपुरावा, साक्षदारांचे जबाब व ॲड. जे. बी. बडे यांनी केलेला युक्तीवाद ग्राहय धरुर आरोपी बंदे नवाज सिकंदर मुल्ला यांची निर्दोष मुक्ताता करण्यात आलेली आहे, आरोपीचे वतीने ॲड.जे.बी.बडे, न्यायालय धारुर यांनी युक्तीवाद केला त्यांना ॲड.एन.बी.पांचाळ, ॲड.एम. बी. भोसले यांनी सहकार्य केले.

## किल्लेधारूर नगर परिषद मुख्याधीकारी घेत आहेत झोपेचे सोंग



**अक्षराज : शुभम शुक्ला**

**दि.०८, किल्ले धारूर :** किल्लेधारूर शहरात अनेक समस्या आ वासून उभ्या आहेत एकही रस्ता धड नाही. खोदलेल्या पाईपलाईनने रस्ते पुर्णपणे खड्डेमय झाले असून रस्त्याने चारचाकी वाहन तर लांबच पण मोटरसायकल ही चालवणे जोखमिचे झाले असुन पडलेल्या पावसाचे पाणी साचून डासांचे प्रमाण वाढले आहे. अनेक सामजसेवक तसेच राजकारणी नागरिकांनी पाऊस उघडला आहे तोवर खड्यात मुरुम टाकून दबयी करा अशी मागणी केली निवेदने दिली पण मुख्याधिकारी साहेब झोपेचे सोंग सोडायला तयार नाहीत. रस्त्यावर मोठे मोठे खड्डे गेली अनेक दिवस नागरिकांनी मागणी करुनही बुजवले नाहीत त्या खड्यात लाईट गेल्यानंतर अनेकजण पडूनही साहेबांना जाग येत नाही हे धारूरकरांचे दुर्दैव आहे असेच म्हणावे लागेल. नवीन रस्ते होण्यासाठी बराच अवधी असून किमान जिथे खड्डे पडलेत तेथे मुरूम टाकावा व पाईपलाईन फुटल्याने खोदलेले मोठे खड्डे बुजून घ्यावेत ऐवढीच माफक अपेक्षा धारूरकर नगरपरिषद मुख्याधिकारी धारुर यांचे कडून करत आहेत.

## बसपाचे ठाणे जिल्हा महासचिव जैस्वार यांना मातृशोक



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०८, कोपरखैरणे (नवी मुंबई) :** बहुजन समाज पाटीचे ठाणे जिल्हा महासचिव राजेश जैस्वार यांच्या मातोश्री कुट्टीदेवी गंगाप्रसाद जैस्वार यांचे नुकतेच दीर्घ आजाराने वयाच्या ६५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. राजेश जैस्वार यांच्या मातोश्रींच्या निधनाची बातमी कळताच अनेकांनी त्यांना फोन करून सांत्वना दिली. राजकीय वर्तुळातील अनेक मान्यवरांनी नेरूळ येथे अंत्यविधीला उपस्थित राहून त्यांच्या मातोश्रींना श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी बहुजन समाज पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश कमिटीचे पदाधिकारी, ठाणे जिल्हा पदाधिकारी, नवी मुंबई युनिट पदाधिकारी, बेलापूर व ऐरोली विधानसभा पदाधिकारी, तसेच मुंबई, रायगड अशा अनेक ठिकाणाहून पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्याचप्रमाणे राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केली आणि ज्यांना उपस्थित राहता आले नाही त्यांनी मोबाईल द्वारे मेसेज पाठवून आपली संवेदना व्यक्त केली.

## निफाड पंचायत समितीत दिव्यांगांकरता मोफत शिबिर




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.८, विंचूर (नाशिक) :** विंचूर ग्रामपालिके तर्फे सर्व ग्रामस्थांना असे कळविण्यात येत आहे की, पंचायत समिती निफाड येथे दि.१९ जून २०२५ रोजी ठीक सकाळी १०:०० वाजता अस्थिव्यंग प्रवर्गाच्या दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम हात, पाय बसवणे व कॅलिपर यांचे मोजमाप घेऊन ऑन द स्पॉट निशुल्क वितरण शिबिर माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांच्या आदेशानुसार पंचायत समिती निफाड सभागृहात आयोजित करण्यात आलेले आहे. तरी जास्तीत जास्त गरजू व्यक्तींनी याचा लाभ घ्यावा. असे ग्रामपालिका विंचूरचे सरपंच सचिन दरेकर व ग्रामविकास अधिकारी आर एस धुंदाळे यांच्याकडून कळविण्यात येत आहे. तरी गरजूंनी जास्तीत जास्त या शिबिराचा लाभ घ्यावा.

# अनुदानित बियाणे मिळवण्यासाठी शेतकऱ्यांचे होत आहेत हाल



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, नांदेड :** शासनाकडून महाडीबीटी पोर्टलवर प्रमाणित बियाण्यांसाठी शंभर टक्के अनुदान देण्यात आले होते व त्याकरिता त्यांनी शेतकऱ्यांकडून महाडीबीटी पोर्टलवर अर्ज मागून घेतले होते. त्याची सोडत दिनांक ३/०६/२०२५ रोजी झाली. ज्या शेतकऱ्यांची निवड १०० टक्के अनुदानित बियाण्यासाठी झाली त्यांना, तुम्ही पुढील पाच दिवसात आपले बियाणे तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क करून घेऊन जावे असे संदेश अर्ज भरताना केलेल्या मोबाईल क्रमांकावर पाठवण्यात आले.

कृषी सहायकाशी याबाबत विचारणा केली असता त्यांनी आवश्यक कागदपत्रासह अमुक दुकानावर तुम्ही जा तुम्हाला तिथे बियाणे देण्यात येईल असे सांगितले. परंतु शेतकऱ्यांनी संबंधित दुकानदाराशी संपर्क केला असता त्यांनी अजून आमच्याकडे काही झाले नाही बियाणे वितरण करण्याचे सायंकाळी ५ नंतर बघू असे सांगितले.

शेतकरी परत कृषी कार्यालयात गेले असता, त्यांनी आजच बियाणे वितरित करायला पाहिजे आम्ही त्यांच्याशी बोलून तुम्हाला सांगतो असे सांगण्यात आले. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. शेतकरी कृषी कार्यालय ते संबंधित बियाणे वितरित करणारा दुकानदार यांच्याकडे येरझारा करून करून बेजार झाले. मुळात बियाणे वितरित करणाऱ्या दुकानदाराकडे नगदीचे दुसरे ग्राहक असल्याने त्यांनी सायंकाळी ५ च्या नंतर बघू म्हणून शेतकऱ्यांना ताटकळत सायंकाळपर्यंत बसवले. यावर कुणाचेही लक्ष नाही तालुका कृषी कार्यालयात दोन वेळेस जाऊन आले तरी पण तालुका कृषी अधिकारी यांचा पत्ता नव्हता. शासनाने सांगितलेल्या एकूण ५ व्हरायट्यापैकी २ दुकानदाराकडे उपलब्ध असून देखील तो एकाच जातीचे बियाणे वितरित करण्यात येणार असल्याचे सांगत होता. कृषी सहाय्यक सहाय्यकाशी संपर्क केला असता ते आम्हाला याबद्दल अजून माहिती नाही असे सांगत होते. तालुका कृषी अधिकारी साहेब तर कार्यालयात हजर नव्हते. मग शेतकऱ्यांनी विचारायचे तरी कोणाला? या निमित्ताने तालुका कृषी कार्यालयाचे बियाणे वितरकावर कोणतेही नियंत्रण व त्यांच्याशी कोणताही ताळमेळ नसल्याचे दिसून आले.

# राष्ट्रीय महामार्गावरील अर्धवट राहिलेल्या रस्त्याच्या कामाला पोलीस बंदोबस्तात सुरुवात



**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.०७, कळंब :** कळंब ते येरमाळा राष्ट्रीय महामार्गावरील कन्हेरवाडी पाटी जवळ अंदाजे ७०० ते ८०० मीटर रस्त्याने काम अनेक वर्षांपासून रखडले होते.

या रस्त्याच्या अर्धवट कामामुळे या ठिकाणी दररोज अपघात होत होते व अनेक कुटुंबांतील कर्त्या माणसाला जीव गमवावा लागला तर काहींना कायमचे अपंगत्व आले होते. राहिलेल्या अर्धवट रस्त्याचे काम पोलीस यंत्रणेसह पोलिस बंदोबस्तात काम करण्यासाठी कंत्राटदार यांनी पोलिस बंदोबस्ताची मागणी केली होती. या मागणीला पोलीस अधीक्षक मा. रितु खोकर यांच्या मार्गदर्शनाखाली कळंब पोलीस निरीक्षक रवी सानप यांच्यासह त्यांचे सर्व सहकारी अधिकारी आणि कर्मचारी यांच्या चोख बंदोबस्तात काम चालू करण्यात आले आहे. मागील दहा महिन्यापूर्वी पोलीस निरीक्षक रवि सानप यांच्या प्रयत्नाने एका बाजूचे काम पूर्ण करून घेतले होते नंतर दुसऱ्या बाजूने काम सुरू केले असता मात्र स्थानीक नागरीकांनी विरोध केला होता व मेगा कंपनी कडुन जास्त यंत्रणा पुरवण्यात कमी पडली. त्यामुळे काम बंद पडले होते. या एक बाजुचे काम पूर्ण झाल्यानंतर अपघाताचे प्रमाण कमी झाले होते.

परंतु दुसऱ्या बाजूने काम करण्यासाठी परत तब्बल दहा महिन्यानंतर पोलीस निरीक्षक रवि सानप यांच्या प्रयत्नाने आणि स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने परत एकदा काम चालू करण्यात आले आहे. यावेळी स्थानिकच्या काही पुरुष व महिला ट्रॅक्टर समोर आडवे उभे राहून काम अडविण्याचा प्रयत्न केला होता त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु कळंब पोलीस निरीक्षक रवि सानप यांनी विरोध मोडित काढत काम चालू करण्यात आले आहे. त्यामुळे प्रवाशी आणि वाहनचालका मध्ये आनंदाचे वातावरण दिसून येत आहे व पोलीस निरीक्षक रवि सानप व त्यांच्या सर्व टीमचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# तानाजी कांबळे यांना महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार जाहीर



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, मुंबई :** मागील २५ वर्षाहून अधिक काळ पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल ज्येष्ठ पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते तानाजी कांबळे यांना महाराष्ट्र सरकारने डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार जाहीर केला आहे.तानाजी कांबळे हे अन्याय,अत्याचाराच्या विरोधात संघर्ष करणारे लढवय्ये कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे.अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,भटक्या विमुक्त जाती,आणि इतर मागास प्रवर्गाच्या कल्याणासाठी, विकासासाठी उल्लेखनिय काम करणाऱ्या व्यक्तींना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने प्रतिवषी अत्यंत महत्त्वाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार दिला जातो.

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : पुरस्कार -२०२५ /प्र.क्र.३६ दिनांक ६ जुन २०२५ अन्वये राज्याचे सामाजिक न्याय मंत्री, नामदार संजयजी शिरसाट यांनी या पुरस्काराची घोषणा केली. ज्येष्ठ पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते तानाजी कांबळे हे आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते आहेत. महापुरुषांच्या विचारांवर त्यांची प्रचंड श्रद्धा आहे.गेली २५ वर्ष ते पत्रकारितेमध्ये कार्यरत असून अनेक वर्तमानपत्रांमध्ये त्यांनी पत्रकारिता केलेली आहे. आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून आणि सामाजिक कार्यातून तानाजी कांबळे यांनी सर्वसामान्य माणसांना न्याय देण्यासाठी जिवाची पर्वा न करता संघर्ष केलेला आहे.अन्यायाच्या विरोधात सरकार पातळीवर वाचा फोडण्याचे काम ते अविरत करीत आहेत. शेतकरी,कामगार ,मजूर,महिला,अपंग व इतर घटकांसाठी त्यांचे मोठे योगदान आहे..

सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ठ पत्रकार तानाजी कांबळे हे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी तालुक्यातील अरुणा प्रकल्पातील बाधित प्रकल्पग्रस्त आहेत. लढा संघर्षाचा अरुणा प्रकल्पग्रस्तांच्या अस्तित्वाचा या संघटनेचे ते अध्यक्ष आहेत. या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी प्रकल्पग्रस्तांसाठी आवाज उठवला होता.तंटामुक्त समितीचे ते अध्यक्षही होते त्यांच्या कारकिर्दीत गावात एकही तंटा बखेडाची नोंद नाही.विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या भारतीय बौद्ध महासभेचे सिंधुदुर्ग जिल्हा शाखेचे ते पदाधिकारी आहेत.महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ठाणे जिल्हा,भवतु सब्ब मंगलम आदी नामवंत संस्थांनी सामाजिक कार्याची दखल घेऊन तानाजी कांबळे यांना सन्मानित केलेले आहे. मुंबईतील झोपडपट्टी धारकांचे प्रश्न,महापालिका कामगारांच्या प्रश्नावर ते सतत काम करीत असतात.

दारूबंदी, अंधश्रद्धा, अपंग, मनोदुब वृद्धांसाठी, तसेच वंचित उपेक्षित घटकासाठी, केलेल्या योगदानाची दखल घेऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी यावर्षीचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार तानाजी कांबळे यांना जाहीर केला आहे. हा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा येत्या १० जून २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, नरिमन पॉइंट, मंत्रालया समोर, मुंबई येथे सकाळी १०.०० वाजता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्याय मंत्री संजयजी शिरसाट, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खा.अरविंद सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत समारंभ पूर्वक प्रधान करण्यात येणार आहे.

# महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या सहविचार सभेत विविध विषयांवर चर्चा



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०८, चंद्रपूर :** महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद जिल्हा चंद्रपूर माध्यमिक ची सहविचार सभा नुकतीच पार पडली. चंद्रपूर जिल्ह्यातील खाजगी माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या सोडविण्यासाठी ही सभा आयोजित करण्यात आली होती.

यावेळी माजी शिक्षक आमदार तथा शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष नागो गाणार, माध्यमिक शिक्षणाधिकारी राजेश पातळे, उपशिक्षणाधिकारी निकिता ठाकरे, लेखाधिकारी प्रफुल्ल वडेट्टीवार यांच्या उपस्थितीत पार पडली. या सभेत अनेक विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अनुपालन अहवाल, शिक्षकेतर कर्मचारी भरती बाबत, निवड श्रेणी, शिक्षकेतर कर्मचारी नियुक्ती, वैयक्तिक मान्यता व शालार्थ आय.डी., सेवानिवृत्त प्रकरणे, सभेचे इतिवृत्त अहवाल, सातव्या वेतन आयोगाच्या मिळालेल्या हप्ताबाबत, एमपीएल, डीसीपीएस खात्याबाबत, वरिष्ठ आणि निवड श्रेणी थकीत वेतनाबाबत, वैद्यकीय बिले, मुख्याध्यापक पदास मान्यता, सेवासातत्य प्रकरणे, सेमी इंग्रजी प्रस्ताव, संघटनेची सहविचार सभा नियमित न होण्याबाबत, निवड वेतन श्रेणी प्रस्ताव प्रलंबित असणे, उपदान, सेवानिवृत्ती वेतन व इतर लाभापासून वंचित ठेवणे , जीपीएफ च्या फायनल विड्राल न मिळणे, आदी विषयांसह अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी काही प्रकरणे निकाली काढण्यात आली तर उर्वरित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचे आश्वासन शिक्षणाधिकारी (माध्राय.) राजेश पातळे यांनी दिले. सभेला महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद महिला आघाडीचे राज्य अध्यक्षा पुजाताई चौधरी, नागपूर विभाग कार्यवाह सुभाष गोतमारे, उपाध्यक्ष विनोद पांढरे, मधुकर मुप्पीडवार, संघटन मंत्री रामदास गिरटकर, चंद्रपूर जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) विलास खोंड, जिल्हा कार्यवाह दिलीप मॅकलवार, जिल्हा कोषाध्यक्ष धनंजय बोरकर, शहर कार्यवाह वंसत वडस्कर, कॉन्व्हेंट विभाग प्रमुख विवेक आंबेकर, जिल्हा संघटनमंत्री डॉ. किशोर टेंभुर्णे , सहकार्यवाह अमोल रेवसकर , विलास वरभे, विलास भागडकर, मनोहर झोडे, सुनील पाचखेडे, हितेश धोटे, प्रमोद धारणे, परमानंद बोरकर आणि संबंधित माध्यमिक शिक्षण विभागाचे सर्व अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते. या सहविचार सभेचे अहवाल वाचन जिल्हाध्यक्ष विलास खोंड तर आभारप्रदर्शन जिल्हा कार्यवाह दिलीप मॅकलवार यांनी केले. या सहविचार सभेला महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदचे जिल्हा आणि तालुका पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अवैध दारूबंदीसाठी ग्रामस्थ, शिवसेना उबाठा चा पोलीस ठाण्यावर एल्गार मोर्चा

**अक्षराज : उद्धव आटोळे**

**दि.०८, लोणार (बुलडाणा) :** लोणार तालुक्यातील येवती येथे खुलेआम अवैध दारू विक्री होत आहे. अवैध दारू विक्री बंद करावी याकरीता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे यांच्या नेतृत्वात येवतीचे सरपंच, उपसरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष व ग्रामस्थ महिलांसह एल्गार मोर्चा काढून अवैध दारू विक्री विरोधी घोषणांनी लोणार पोलीस स्टेशन परिसर दणाणून गेला.

लोणार तालुक्यातील येवती गाव हे सामाजिक सलोख्याचे व एकात्मतेचे एक उदाहरण आहे. परंतु २ वर्षापासून या गावात व तालुक्यातील ग्रामीण भागात अवैध दारू विक्रीचा सुळसुळाट माजलेला आहे. या अव्यध दारूमुळे या गावातील अनेक कुटुंब उध्वस्त झाले आहे दारूपाई गावातील अनेक लोकांनी आपले जीव गमावले आहे. अनेक महिलांनी पुरुषांच्या दारूपायी आत्महत्या करून आपली जीवन यात्रा संपवली आहे व पोलीस प्रशासन हे सर्व उघड्या डोळ्यांनी बघत आहे.

या गावातील व तालुक्यातील अवैध दारू विक्री बंद करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे, तालुकाप्रमुख ॲड. दीपक मापारी, शहरप्रमुख गजानन जाधव यांच्या नेतृत्वात येवती येथील शेकडो महिला व शिवसैनिकांनी पोलीस स्टेशनवर यलगार मोर्चा काढून अवैध दारू विक्रीवर बंदीची मागणी केली.

मोर्चात अवैध दारू विरोधात घोषणांनी परिसर दराने गेला. या एल्गार



मोर्चा शिवसेनेचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे, तालुकाप्रमुख ॲड. दीपक मापारी, शहर प्रमुख गजानन जाधव, शहरउपमुख लूकमान कुरेशी, ज्येष्ठ शिवसैनिक सुदन अंभोरे, शहर संघटक तानाजी मापारी, गजानन बोरुडे, युवासेना शहरप्रमुख श्रीकांत मादनकर, अल्पसंख्यांक विभागाचे अशपाक खान, इकबाल कुरेशी, फहीम खान, विभाग प्रमुख तानाजी अंभोरे, गोपाल मापारी, युवतीच्या सरपंच प्रयागबाई पाटोळे, तंटामुक्ती अध्यक्ष गोदावरीताई कायंदे, उपसरपंच रामेश्वर कायंदे, ग्रामपंचायत सदस्य दशरथ शिंदे, ज्योतीताई सरकटे, कुसुमताई टाकसाळकर, विशांती अडागळे, कलीम कुरेशी, मंगेश मोरे, योगेश भूक्कन, शमीम शेख, विजय घोडके यांच्यासह मोठ्या संख्येने गावकरी व शिवसैनिक महिला उपस्थित होत्या.

# थोडक्यात

## आपलं घर येथील मुलांना कवी कोठावळे यांचे बाल साहित्य भेट



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०७, धाराशिव :** नळदुर्ग, आपलं घर बालगृह नळदुर्ग जिल्हा धाराशिव येथे दिनांक ०७ जून २०२५ रोजी राष्ट्र सेवा दल संचलित आपलं घर अनाथ बालगृह नळदुर्ग येथे बाल साहित्यिक आशुबा अंकुश कोठावळे यांचा आपलं घरचे व्यवस्थापक विलास वकील सर यांनी अनाथ मुलांनी बनवलेला फुलांचा गुच्छ देऊन स्वागत केले. कवी आशुबा कोठावळे यांच्या महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई यांनी प्रकाशित केलेल्या शब्द पेरणी बालमनातील हा बालकविता संग्रह व कथांचे बीजगोळे हा बालकथा संग्रह अनाथ मुलांना वाचनाची गोडी निर्माण व्हावी. यासाठी दोन्ही संग्रह भेट दिले.

बोलताना कवी कोठावळे म्हणाले की, मुलांनी खूप वाचलं पाहिजे व खूप अभ्यास करा. खूप मोठे अधिकारी व्हा. विद्यार्थ्यांना काही बालकविता ऐकवल्या, त्यामध्ये झिम्मा फुगडी, आभाळाला भांडू आता, तसेच ज्या कवितेची अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे निवड झालेली होती,शेती मातीची कविता जोंधळा ही गेय स्वरूपात सादर केली. एक गझल ऐकवली. कविता कशी असते. कविता कशी लिहितात कवितांचे विषय कोणते विषयी मुलांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक पन्नालाल सुराणा सर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास वकील यांनी केलं. आपलं घरं चे अधीक्षक संदीप चवले यांनी आभार मानले. कोठावळे सहकुटुंब उपस्थित होते. तसेच यावेळी आपल घरचे सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संजीवनी देणारा अहमदनगर - माळशेज घाट रेल्वेमार्गा कागदावरच !

### कृती समितीसह प्रवाशांमधून नाराजी; झुकझुक गाडीचे स्वप्न कधी पूर्ण होणार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, अहिल्यानगर :** अहमदनगर, ठाणे, पुण्याच्या ग्रामीण भागासाठी वरदान ठरणाऱ्याआणि तब्बल ३० वर्षांपेक्षाही अधिक काळ रखडलेल्या माळशेज रेल्वे मार्गाचे प्राथमिक आणि तांत्रिक सर्वेक्षणाचे काम कल्याण ते नगरपर्यंत पूर्ण झाले आहे. या मार्गावर २६ रेल्वे स्थानके प्रस्तावित असून या मार्गाच्या प्रत्यक्ष कामाला कधी मुहूर्त मिळणार, या प्रतीक्षेत तिन्ही जिल्ह्यातील नागरिक आहेत.


घाटाचा विकास व्हावा तसेच जलद वाहतूकीसाठी हा रेल्वे मार्ग प्रस्तावित होता. या मार्गाचे तांत्रिक सर्वेक्षणाचे काम सुरू करण्यात आले होते. कल्याण ते अहमदनगर पर्यंत सर्वेक्षणाचे काम पूर्णही झाले. त्यावेळीचे ठाणे जिल्हा रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष ओमप्रकाश शर्मा यांनी मागितलेल्या माहितीच्या अधिकारात ही माहिती मागिल काहीवर्षांपूर्वी उघडकीस आणली होती. या मार्गाचे तांत्रिक सर्वेक्षण एक वर्षाआधीच पूर्ण करण्यात आले आहे.

हा मार्ग कल्याण, अंबरनाथ, मुरबाड, माळशेज घाट, ओतूर ते नगर असा जाणार आहे. या मार्गावर कल्याण, विठ्ठलवाडी, उल्हासनगर, अंबरनाथ कांभा रोड, आपटी, पाटगाव, मुरबाड, राव, डाहेरी मिल्हे, नागतार केबिन, वारीवघर केबिन, देवरूखवाडी, केबिन, मढ, जुन्नर रोड, ओतूर, पदरवाडी, मालवाडी, कोटडावाडी, शिंदेवाडी, वासुंदे, टाकळी ढोकेश्वर,धोत्रे, भाळवणी, हमीदपूर आणि अहमदनगर अशी रेल्वे स्थानके प्रस्तावित करण्यात आली आहे.

हा रेल्वे मार्ग पूर्णत: फायद्यात असल्याचे सांगण्यात येत असून या तांत्रिक सर्वेक्षणाचाचा प्राथमिक अहवाल येऊनही अंतिम अहवाल तयार करण्यात आल्यानंतरच तो रेल्वे बोर्डापुढे मान्यतेसाठी ठेवला जाणार होता. त्यासाठी एक रेल्वे कृती समिती सातत्याने पाठपुरावा करत होती. मात्र या समितीला महाराष्ट्रातील सर्वच राजकीय पक्षांच्या खासदारांनी पाठिंबा देऊनही त्याला मान्यता का मिळाली नाही ? त्यामुळे राज्यातील खासदार हा मार्ग यंदाच्या रेल्वे बजेटमध्ये तरी ट्रॅकवर येईल आणि ३० वर्षांचा वनवास संपेल असे वाटत होते पण रेल्वे विभाग आजही लोकाभिमुख नसल्याने स्थानिक पातळीवर होणाऱ्या मागण्यांची दखल वरच्या स्तरापर्यंत घेतलीच जात नाही. एकादी तक्रार करायची असेल तर ती नेमकी कोठे करावी, हे बऱ्याचदा सुशिक्षित प्रवाशांनाही ठाऊक नसते.

त्यामुळे इथले खासदार रेल्वे प्रश्नांवर संघटीत होत आक्रमक कधी होणार हा खरा प्रश्न आहे. मग ग्रामीण भागातील लोकांची काय कथा? त्यांचा आवाज कधी दिल्ली दरबारा पर्यंत पोहचत नाही. हीच महाराष्ट्र राज्यातील खासदारांच्या अपयशाची अप्रत्यक्ष कबूली आहे. अन्य राज्यांमध्ये रेल्वे मंत्रालयच मार्ग उभारते, परंतु इथे महाराष्ट्र सरकारला निम्मा खर्च करण्याची तयारी दर्शवावी लागते ? ही तयारी दर्शवल्यावरही रेल्वेमार्ग मंजूर होण्याचे प्रमाण अत्यल्प आहे.

अहमदनगर - कल्याण हा रेल्वे मार्ग अस्तित्वात आला तर विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण नजिकच्या मार्गाने मुंबईशी जोडले जातील त्यामुळे हा नवा माळशेज घाट रेल्वे मार्ग ठाणे, पुणे आणि अहमदनगर या तिन्ही जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या दृष्टीने विकासाचे नविन पर्व घेऊन येणार असे वाटते आहे.



माळशेज, अहमदनगर, पुणे आणि ठाणे रेल्वे मार्ग होण्यासाठी शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.अमोल कोल्हे, व माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील तसेच अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे खासदार निलेश लंके तसेच माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील, पारनेचे विद्यमान आमदार काशिनाथ दाते, जुन्नरचे आमदार शरद दादा सोनवणे व माजी आमदार अतुल बेनके तसेच ठाणे या तिन्ही जिल्ह्यातील लोकसभा मतदारसंघातील खासदारांनी एकत्र पुढाकार घेऊन हा मार्ग लवकरात लवकर पूर्ण व्हावा. अशी मागणी होत आहे.

**तब्बल ३० वर्षांपेक्षा अधिक काळापासून काम रखडले**

अहमदनगर ते कल्याण रेल्वे मार्गाचे सर्वेक्षणाचे काम पूर्णतः फायद्याचा मार्ग असल्याचा दावा माळशेज पट्ट्याच्या विकासाला तारक जुन्नरच्या पर्यटन विकासाला फायदा अहिल्यानगर, ठाणे आणि पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना दूरची बाजारपेठ नजीक उपलब्ध होऊन शेतकऱ्यांना उत्पन्नाचा नविन पर्याय मिळेल. मागील चार दशकांहून अधिक काळ प्रतीक्षेत असलेल्या तिन्ही जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे झुकझुक गाडीचे स्वप्न पूर्णत्वास आणण्यासाठी आता गरज आहे ती राजकीय पाठबळाची !

## अनधिकृत शाळांमधील १८ ते २० हजार विद्यार्थ्यांचे शालेय भवितव्य धोक्यात येऊ देणार नाही

**अक्षराज : विनोद वास्कर**



**दि.०८, दिवा (ठाणे) :** दिवा शहरात एवढ्या मोठया प्रमाणात अनधिकृत शाळा वाढल्या आहेत. जवळ जवळ दिवा प्रभाग समितीच्या हद्दीत ५८ अनधिकृत शाळा असून १८ ते २० हजार विद्यार्थी शिकत आहेत. त्या विद्यार्थ्यांच शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे. सपना रोशन भगत यांनी असं म्हटलं आहे की, दिवा शहरात एवढ्या मोठ्या प्रमाणात अनधिकृत शाळा झाल्या कश्या? यावर प्रशासनाने वेळीच लक्ष का दिले नाही? या मोठ्या प्रमाणात वाढलेल्या अनधिकृत शाळांच्या बांधणीत कोणत्या राजकीय नेत्यांचे साठे लोटे तर नाहीत ना? दिवा शहरातील एक जबाबदार नागरिक म्हणून दिवा शहराचे नाव प्रत्येक गोष्टीत अनधिकृत म्हणून संबोधले जाते तेव्हा मनाला वेदना होतात. म्हणून माझी प्रशासनाला विनंती आहे की, आपण या गंभीर तितक्याच संवेदनशील विषयाकडे गांभीर्यपूर्वक लक्ष देऊन दिवा शहरात अनधिकृत शाळा बंद करून या शाळांमध्ये शिकणाऱ्या १८ ते २० हजार विद्यार्थ्यांना न्याय मिळवून द्यावा. यात्रसंगी आम्ही महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांची भेट घेऊ.

## मुस्लीम बांधवानी ईदगाह येथे एकत्रीत आदा केली ईदची नमाज



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०७, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी शहरातील ईदगाह येथे सर्व मुस्लीम समाज बांधव एकत्रीत जमा होवून शांततेत उत्साहात ईदूल अजाहाची नमाज आदा केली. यामुळे शहरात सर्वत्र आनंदीत वातावरण दिसायला मिळाले. नमाज नंतर एकमेकाना गळा भेट घेत ईदच्या शुभेच्छा दिले. दिनांक ०७ जुन २०२५ रोजी बकरीद ईद निमीत्त मुस्लीम समाज बांधव जामा मस्जिद व मुन्वर मस्जिद येथे ८:३० वाजता जमा होवून एकत्रीत ईदगाहकडे प्रस्तान केले. सकाळी ९ वाजता ईदगाह येथे जामा मस्जिदचे हाफिज सय्यद गौस सय्यद खुद्दूस यांच्या पाठीमागे सर्व गावातील मुस्लिम समाज बांधव एकत्रीत शांततेत उत्साहात ईदची नमाज आदा केली, यावेळी खुदबा व दुआ, मुन्वर मस्जिदचे मौलवी हाजी नवाब मोलिसाब यांनी दिली. यावेळी ईदगाह कमेटीचा अध्यक्ष सय्यद मंसूर अली, उपाध्यक्ष मोहम्मद अफजल व त्यांच्या समितीच्या वतीने शहरातील जामा-मस्जिद ईमाम सय्यद गौस, मुन्वर मस्जिद मौलवी हाजी नवाब मौलाना, बिलाल मस्जिद ईमाम हाफिज मुजम्मिल तसेच जामा-मस्जिद अध्यक्ष सिराज पट्टेदार, मुन्वर मस्जिद अध्यक्ष मोहम्मद नजिर, बिलाल मस्जिद अध्यक्ष हाजी लियाखत अली आदीसह बिलोली तहसीलचे नायब तहसीलदार रघुनाथसिंह चौहान, कुंडलवाडी पोलिस ठाण्याचे सपोनि.ज्ञानेश्वर शिंदे,पोउनी गजेंद्र मांजरमकर, मुत्तपोड, गिरदावार लक्ष्मीकांत आंबेराय, तलाठी पवन ठकरोड, नगर परिषद दारोगा धोडिबा वाघमारे आदींचा सत्कार करण्यात आला.या नंतर सर्व उपस्थित मुस्लिम समाज बांधव एकमेकांना गळा भेट देवून ईदच्या शुभेच्छा दिले. नगर परिषदतर्फे ईदगाह स्वच्छता, टेंट, पिण्याच्या पाण्याची व माईक सिस्टमची व्यवस्था केली. शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावे. यासाठी सपोनि.ज्ञानेश्वर शिंदे व पोलिस कर्मचारी ईदगाह येथे बंदोबस्त ठेवले होते. मुस्लिम बांधवाना ईद च्या शुभेच्छा दिले. ईदच्या नमाज नंतर मुन्वर मस्जिद कमेटीच्या वतीने मान्यवरांचे सत्कार करण्यात आले.

## खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांचा धाराशिव जिल्हा शिवसेनेच्या वतीने सत्कार



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०८, धाराशिव :** पाकिस्तान्यांनी पेहेलगाम येथे पर्यटकांवर केलेल्या हल्लयानंतर भारत देशाने ऑपरेशन सिंदुर मोहीम राबवून दहशतवाद्यांना नामोहरम केले. ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर खासदार डॉ.श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी भारताने पाकिस्तानवर केलेल्या कारवाईबाबत देशाची बाजू जगभरातील विविध देशात जाऊन मांडली. तसेच पाकिस्तानबाबत ही विविध देशाच्या प्रतिनिधींची मते जाणून घेतली. या दौर्यावरुन परतल्यानंतर धाराशिव जिल्ह्याच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज राजाभाऊ साळुंके यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचा सत्कार केला. ऑपरेशन सिंदूर च्या यशानंतर जागतिक पातळीवर खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्त्वाखालील खासदारांच्या शिष्टमंडळाने विविध देशाचा दौरा केला. या दौर्यात जागतिक स्तरावर खा.डॉ.शिंदे यांनी भारताची भूमिका भक्कम पणे मांडली. युएई, लायबेरिया, कांगो, सिएरा अशा विविध देशांमध्ये त्यांनी ऑपरेशन सिंदुरबाबत मते जाणून घेत पाकिस्तानच्या कुटील धोरणाबाबत ही त्यांनी चर्चा केली. अनेक देशांनी दहशतवादाला पोसणार्या पाकिस्तानबाबत नकारात्मक वक्तव्य केल्याचे खासदारांच्या शिष्टमंडळाला दिसून आले. अनेक देशांनी भारताच्या दहशतवादाविरोधातील भूमिकेचे समर्थन केले. दौरा यशस्वीपणे पार पडल्यानंतर खा.डॉ.श्रीकांत शिंदे हे भारतात परतले असता त्यांच्या ठाणे येथील निवासस्थानी धाराशिव जिल्हा शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच त्यांची ही भूमिका शिवसैनिकांसाठी अभिमानास्पद असल्याचे सांगत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी युवासेना शहरप्रमुख सागर कदम, आकाश कोकाटे यांच्यासह धाराशिव जिल्हा शिवसेनेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## आ.मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे सुटणार पिण्याच्या पाण्याची समस्या

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.०८, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्यासमोर कोणतीही समस्या आली, की तिचा ठामपणे पाठपुरावा करून ते नेहमीच ठोस उपाययोजना करतात. समस्या शहरी असो वा ग्रामीण, समाधानकारक मार्ग शोधण्याची आणि जनतेच्या अडचणी दूर करण्याची त्यांची तत्परता नेहमीच अनुभवास येते. आता त्यांच्या पुढाकारामुळे नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातील पिण्याच्या पाण्याच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी आमदार निधीतून २१ हातपंप व सोलार पंप बसविण्याच्या कामाला एकूण ७१ लक्ष ६२ हजार रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

यामुळे मुल, बल्लारपूर, पोंभुर्णा आणि चंद्रपूर तालुक्यातील विविध गावांतील नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध होणार आहे. आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या योजनेला मंजुरी मिळाल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. उन्हाच्या तीव्र तडाख्यात पिण्याच्या पाण्याची वाढती गरज लक्षात घेऊन आ. सुधीर मुनगंटीवार यांनी बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील विविध भागांमध्ये हातपंप व सोलार पंप बसविण्यासाठी पुढाकार घेतला होता. यामुळे ग्रामीण भागातील सोलार पंप लवकरच कार्यान्वित होणार आहेत.

### हातपंप बसवण्याची कामे

या मंजुरी अंतर्गत मुल तालुक्यातील चिचाळा (मो), जुनासुर्ला, भेजगांव, येरगांव/बेलगांव येथे कुणबी समाज मंदिराजवळ, तसेच बल्लारपूर तालुक्यातील श्रीमती सुनीता मातंग यांच्या घराजवळ, पोंभुर्णा तालुक्यातील टोक, गंगापुर चक आणि चंद्रपूर तालुक्यातील दुर्गापुर (गणना शहर) येथील वार्ड क्रमांक ४ गोसिया मस्जिद परिसर, भीम नगर येथे हातपंप बसविण्याची कामे करण्यात येणार आहेत. या ११ कामांना एकूण २१ लक्ष ६१ हजार रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

### सोलार पंप बसविण्याची कामे

याशिवाय, बल्लारपूर तालुक्यातील टिळक वार्ड, दादाभाई नौरोजी वार्ड, महात्मा गांधी संकुलाजवळ तसेच मुल तालुक्यातील उश्राळा चक, फिस्कुटी, पोंभुर्णा तालुक्यातील चक ठाणेवासना आणि चंद्रपूर तालुक्यातील चारगाव येथे सोलार पंप बसविण्याच्या १० कामांना ५० लक्ष १ हजार रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या सर्व कामांसाठी मिळालेल्या मंजुरीचे एकूण मूल्य ७१.६२ लक्ष रुपये आहे. या कामांमुळे उन्हाच्या तीव्र तडाख्यात पिण्याच्या पाण्याची वाढती गरज पूर्ण करता येणार आहे. गावांमधील पिण्याच्या पाण्याची समस्या सुटेल आणि स्वच्छ पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे.